215

ग्राहक: एवं राजा

# अखिल भारतीय ग्राहक पंचायत

शाखा : अहमदनगर जिल्हा
महाराष्ट्र राज्य नोंदणी क्र. महा. २९४/२००८

**रणजित रुपचंद श्रीगोड**
(अध्यक्ष – अहमदनगर जिल्हा ग्राहक पंचायत)
मु.पो.बेलापूर, ता.श्रीरामपूर,
जि.अहमदनगर. मो.९३२६६१२१४९

**नाशिक विभाग**

अध्यक्ष
**मार्तंडराव जोशी**, नंदुरबार

संघटक
**अरुणराव भार्गवे**, नाशिक

**जिल्हा कार्यकारणी**

अध्यक्ष
**रणजित श्रीगोड**, श्रीरामपूर

संघटक
**बाबासाहेब भालेराव**, अहमदनगर

सहसंघटक
**प्रा.दत्तात्रय गाढे**, कोपरगांव
**सौ. शुभांगी पावसे**, श्रीगोंदा

सचिव
**गजेंद्र क्षिरसागर**, अहमदनगर

सहसचिव
**ॲड. सुरेश भाटे**, अकोले

कोषाध्यक्ष
**शब्बीर शेख**, अहमदनगर

E-mail :
abgrahakpanchayat@yahoo.co.in

## सामंजस्य करार (MOU)

दि. १५ मार्च २०१०

आम्ही खाली सह्या करणार

१. रयत शिक्षण संस्थेचे सी. डी. जैन कॉलेज ऑफ कॉमर्स, श्रीरामपूर

२. ग्राहक पंचायत, महाराष्ट्र, अहमदनगर जिल्हा

ग्राहक प्रबोधनासाठी सी. डी. जैन कॉलेज व अहमदनगर जिल्हा ग्राहक पंचायत यांच्या संयुक्त सहकार्याची आवश्यकता पुढील कारणामुळे निर्माण होते.

१. समाजातील सर्वसाधारण ग्राहकाच्या विविध समस्या

२. बी-बियाणे, रासायनिक खते यांची खरेदी करतांना शेतक-यांची होणारी फसवणूक

३. महिला ग्राहकांच्या समस्या

४. विद्यार्थ्यांमध्ये ग्राहक हक्काची जाणीव नसणे व त्यामुळे निर्माण होणा-या समस्या.

५. ग्राहक हक्काच्या जागृतीसाठी ग्राहक प्रबोधनाची आवश्यकता.

६. जाहिरातींचा भडिमार व ग्राहकांची फसवणूक

७. विद्यार्थ्यांची फसवणूक

८. समस्या आहेत परंतु समस्यांची जाणीव नसणारा समाज

९. प्रलोभनाद्वारे ग्राहकांची फसवणूक

यांप्रमाणे अनेक समस्यांना ग्राहकांना सामोरे जावे लागते. विद्यार्थी हा सुध्दा ग्राहक आहे व त्याच्याही समस्या आहे. सर्व समस्यांमधून ग्राहकांची सोडवणूक करण्यासाठी ग्राहक प्रबोधनाची आवश्यकता आहे.. ग्राहक पंचायत व वाणिज्य शाखेतील क्षेत्रात नावलौकिक मिळविलेले सी.डी.जैन महाविद्यालय यांच्या संयुक्त प्रयत्नाद्वारे निशिचतपणे वरील समस्यांवर उपाययोजना करणे शक्य होईल. यासाठी ग्राहक पंचायत व सी. डी. जैन कॉलेज यांच्यामध्ये पुढीलप्रमाणे सामंजस्य करार करण्यात येत आहे.

**करारातील प्रमुख बाबी :**

१. अहमदनगर जिल्ह्यातील विशेषत: श्रीरामपूर तालुक्यातील विविध शाळांमध्ये व महाविद्यालयामध्ये व्याख्याने व अभ्यास शिबीरांच्या आयोजनात ग्राहक पंचायत व सी.डी.जैन कॉलेजमधील प्राध्यापकांचा सक्रीय सहभाग राहील.

२. श्रीरामपूर तालुका ग्राहक पंचायतीचे अध्यक्ष डॉ. गोरख बारहाते यांचा सहभाग समन्वयाच्या दृष्टीने व कार्यक्रमाच्या आयोजनाच्या दृष्टीने अग्रभागी राहील.

**राज्य कार्यकारणी**

| संस्थापक | अध्यक्ष | कार्याध्यक्ष | संघटक |
|---|---|---|---|
| बिंदुमाधव जोशी, पुणे | डॉ. विजय लाड, नांदेड | प्रा.सुभाष सरदेशमुख, सोलापूर | सर्जेराव जाधव, पुणे |

Chandraroop Dakale Jain College of Commerce, Shrirampur

३. राष्ट्रीय ग्राहक दिन (२४ डिसेंबर) व जागतिक ग्राहक दिन (१५ मार्च) यांचे संयुक्त आयोजन करण्यात येईल.

४. राष्ट्रीय व जागतिक ग्राहक दिनानिमित्त होणा-या शासकीय कार्यक्रमास ग्राहक पंचायतीचे पदाधिकारी व कार्यकर्ते, तसेच महाविद्यालयीन प्राध्यापक उपस्थित राहून सामाजिक प्रश्नांवर चर्चा करतील.

५. विद्यार्थ्यांचे प्रश्न संयुक्तपणे सोडविण्यासाठी शासनाच्या विविध स्तरावर प्रयत्न केले जातील.

६. शोषणमुक्त समाज निर्मीतीसाठी ग्राहक प्रबोधनाचे कार्यक्रम राबविले जातील.

७. ग्राहकांच्या समस्यांचे निराकरण समन्वयातून व चर्चेद्वारे झाले नाही तर जिल्हा न्याय मंचाकडे तक्रार दाखल करणेबाबत प्रा. डॉ. गोरख बारहाते, डॉ. बबनराव आदिक हे महाविद्यालयाच्या वतीने व श्री. अनिल कुलकर्णी आणि श्री. रणजित श्रीगोड हे ग्राहक पंचायतीच्या वतीने ग्राहकांना मदत करतील.

८. वरील सर्व कामकाज सामाजिक जाणीवेच्या भुमिकेतून केले जाईल व यासाठी महाविद्यालय अथवा ग्राहक पंचायत कोणताही मोबदला घेणार नाहीत.

९. महाविद्यालयात प्रथमवर्ष वाणिज्यासाठी "ग्राहक संरक्षण व व्यावसायीन नितीमत्ता" हा ऐच्छिक विषय आहे. सदर विद्यार्थ्यांनाही ग्राहक प्रबोधनाच्या सामाजिक कामकाजात सहभागी करुन घेतले जाईल.

१०. सी.डी.जैन कॉलेज व अहमदनगर जिल्हा ग्राहक पंचायत समाजातील समस्यांना नमते करुन शोषणमुक्त समाज निर्मितीसाठी विनामोबदला कामकाज करील.

ठिकाण - श्रीरामपूर

दि. १५ मार्च २०१०

| प्राचार्य | अध्यक्ष | अध्यक्ष |
|---|---|---|
| सी.डी.जैन कॉलेज ऑफ कॉमर्स<br>श्रीरामपूर | श्रीरामपूर तालुका<br>ग्राहक पंचायत, महाराष्ट्र | अहमदनगर जिल्हा<br>ग्राहक पंचायत, महाराष्ट्र |

अध्यक्ष
श्रीरामपूर तालुका
ग्राहक पंचायत, महाराष्ट्र

Chandraroop Dakale Jain College of Commerce
Shrirampur

PRINCIPAL
C D Jain College of Commerce
Shrirampur